FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station भा.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. 34 वर्ष Year 2024, दिनांक Date 06/12/2024

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि 1988, कलमे Sections 7 प्रमाणे
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार, तारीख पासून 05/12/24, वेळ 13.00 वा, तारीख पर्यंत 05/12/24 वेळ 19.00 वा
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date 29/11/2024, वेळ Time 16.00 वा
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02/2024, तारीख Date 06/12/2024, वेळ Time 07.15 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence :
   (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. दक्षिणेस 4 Km, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chowki/Beat/O.P. Name and No. –
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सहा. अभियंता यांचे कार्यालय, ठिकाणाचे नंबर No. if any घ क्र., ई, गल्ली Ward वार्ड, भायखळा, रस्त्याचे नाव Name of road मुंबई.
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place फायर ब्रिगेड कार्यालय, भायखळा, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka, जिल्हा Distt. ..., राज्य State ...
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Distt. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name धिरज शामजी गोहील (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name शामजी गोहील
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age 50 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9821656564
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. – दिल्याचा दिनांक Date of Issue – दिल्याचे ठिकाण Place of Issue – (f) व्यवसाय Occupation कॉन्ट्रक्टर
   (g) धर्म Religion हिंदु, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता Address : ... गल्ली / सर्वे नं. Ward ... घर / नाव नंबर House/Name No. ... फोन /मो. नंबर Phone/M. No. ... पॅन नं. Pan No. ... वोटर्स नं. Card No. ...
   रस्त्याचे नाव Road दोस्ती ॲकर्स ब्लोसम बिल्डिंग, बी विंग, रूम नं १००७, वडाळा अन्टॉप हिल, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.
   तालुका Taluka मुंबई, जिल्हा Distt. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address वर प्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्री. रंजन चंद्रकांत वाशवे, वय ५३ वर्षे, व्यवसाय-नोकरी सहाय्यक अभियंता घन कचरा व्यवस्थापन विभाग, ई वार्ड, मुंबई. रा. रि. ब्लॉ-२, तळमजला, ईंद्रवदन सहकारी गृह संस्था, पद्मावाई ठक्कर रोड, शिवाजी पार्क माहिम, मुंबई 400016.

फिर्यादी श्री. धिरज शामजी गोहील, वय ५० वर्षे, धंदा कॉन्ट्रक्टर, रा.ठि. दोस्ती एकर्स असोसन बिल्डिंग, बी विंग, रुम नं १००५, वडाळा, ॲन्टॉप हिल, मुंबई यांचा स्वतंत्र पानावर नोंद केलेला जबाब हीच सदर गुन्ह्याची प्रथम खबर अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(प्रकाश सोनवणे)
सहाय्यक पोलिस आयुक्त
आ.प्र.वि. मुंबई

फिर्याद      दिनांक — ०६/१२/२०२४.

श्री. धिरज शामजी गोहील ,वय ५० वर्षे, व्यवसाय — कॉन्ट्रक्टर, रा. ठि. दोस्ती अेकर्स ब्लोसम बिल्डींग, बी विंग, रुम नं. १००७, वडाळा, अॅन्टॉप हील, मुंबई ४०००३७ मो. नं ९८२१६५६५६४

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियासमवेत चार वर्षापासुन रहात आहे. मी मुंबई महानगरपालीकेमध्ये घन कचरा व्यवस्थापन विभागांतर्गत ''पैसे द्या आणि वापरा'' तत्वावरील शौचालय बांधकाम ठेकेदार आहे. सदरची ठेकेदारी मी सुमारे २५ वर्षापासुन करतो. सदर ठेकेदारीचे माझ्याकडे शासकिय प्रमाणपत्र आहे. त्याचा रितसर परवाना माझ्या जवळ असुन त्याचा नोंदणी क्रमांक एफ २१३१४ असुन त्याची नोंदणी मे. मानव सेवा संघ, मुबई अश्या नावाने केलेली आहे. सदर संस्थेमध्ये मी सेक्रेटरी म्हणुन काम पाहतो. तसेच माझे नावे अजून एक मे. मानव कल्याण सेवा संघ या संस्थेच्या नावे नोंदणीकृत परवाना असुन त्याचा नोंदणी क्रमांक १०४३ असा आहे. मी सदर संस्थेमध्ये उपाध्यक्ष म्हणुन काम पाहतो.

मे. मानव सेवा संघ मुंबई या संस्थेच्या वतीने महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभाग, 'ई' वार्ड अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड वरील वाहतुक चौकी शेजारी असलेल्या ''पैसे द्या आणि वापरा'' तत्वावरील शौचालयाचे बांधकाम करून सदर शौचालयाची देखभाल व परिक्षण करण्याचे कामाचे कॉन्ट्रक्ट घेतले होते. सदरचे बांधकाम पुर्ण झाले असुन त्याचा वापर सुरू आहे. तसेच दुसरे कॉन्ट्रक्ट मे. मानव कल्याण सेवा संघ या संस्थेच्या नावाने घेतले असुन त्याचे बांधकाम रे रोड, रेल्वे स्टेशन जवळ, नाथपै रोड, मुंबई येथे केले आहे.

प्रमुख अभियंता, घन कचरा व्यवस्थापन विभाग यांनी प्रसारीत केलेले परिपत्रक क्रमांक प्र.अभियंता /१६९४/घकव्य दि. ३०/०४/२०११ अन्वये ''पैसे द्या आणि वापरा'' या तत्वावर चालवित असलेल्या 'ई' वार्ड अंतर्गत शौचालय संदर्भात महानगरपालिके सोबत करारनामा करण्याबाबत मला मनपाच्या अधिकारी यांनी सांगितले होते. त्याप्रमाणे मी मे. मानव सेवा संघ मुंबई व मे. मानव कल्याण सेवा संघ यां संस्थांच्या नावे सदर करारनामा करण्यासाठी ई विभागाकडे सन २०२१ मध्ये अर्ज सादर केला होता. त्याचा मी वारंवार मनपा कार्यालयाच्या ई विभागामध्ये जावुन पाठपुरवठा करीत होतो.

विधानसभा निवडणुकीच्या पुर्वी माहे आक्टोबर मध्ये सदर विभागाचे सहाय्यक अभियंता रंजन बागवे यांना भेटुन माझे दोन्ही अॅग्रिमेंट करण्याबाबत विनंती केली होती. परंतु त्यांनी सांगितले की, मी निवडणुकीच्या कामामध्ये सध्या व्यस्त असल्याने निवडणुका झाल्यावर बघु. त्याप्रमाणे मी दि.२८/११/२०२४ रोजी मनपा ई विभागाच्या कार्यालयात श्री. रंजन बागवे साहेबांना भेटलो असता त्यांनी सांगितले की, तुझे दोन अॅग्रिमेंट असुन त्याचे प्रत्येकी ५ लाखाप्रमाणे १० लाख रूपये द्यावे लागतील. मी त्यांना सांगितले ''साहेब १० लाख खुपच जास्त होतात, एवढे पैसे माझे कडे नाहीत'' त्यावर बागवे साहेबांनी सांगितले की, १० लाख रूपये मला एकटयालाच मिळणार नाहीत, त्यातून सहाय्यक अभियंता व उप अभियंता यांनाही हिस्से द्यावे लागणार आहेत. त्यानंतर बागवे साहेबानी तडजोड करून दोन अॅग्रिमेंटचे ६ लाख रूपये द्यावे लागतील अशी डील केली.

माझी सहाय्यक अभियंता बागवे साहेबांना व त्यांच्या वरिष्ठांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.२९/११/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, वरळी, मुंबई येथे लेखी तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे त्याच दिवशी श्री रंजन बागवे, यांचेविरुध्द पडताळणी कारवाई करीता लाप्रवि कार्यालयात हजर होतो. एसीपी सोनवणे साहेब यांच्या कक्षात आणखी तीन इसम बसले होते, त्यांची ओळख मला पोलीस निरीक्षक गणेश सुर्यवंशी साहेब व दोन शासकिय पंच क्र १ श्री. सुरवाडे व पंच क्र २ श्री.गव्हाणे अशी एसीपी सोनवणे साहेबांनी करुन देवून ते पडताळणी कारवाईमध्ये सहभागी होणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर दोन्ही पंचाना पो.नि.सुर्यवंशी यांनी माझे स्वहस्ताक्षरातील लिहीलेला तक्रार अर्ज दाखविला त्यावर दोन्ही पंच व दोन्ही पोलीस अधिकारी यांनी समक्ष म्हणुन सहया केल्या व त्याची एक प्रत मला रिसीव्ह म्हणुन दिली व सदरचा अर्ज पो.नि. सुर्यवंशी यांनी पुढील कारवाईकरिता स्वत:कडे ठेवुन घेतला. त्यानंतर पोनि सुर्यवंशी हे मला व पंचांना गोपनीय कक्षात घेवुन गेले तेथे टेक्नीशीयन पो.ह रावराणे यांची ओळख करून दिली. तेथे माझे, पो.नि. सुर्यवंशी व दोन पंच यांचे वक्तव्य एका व्हॉइस रेकॉर्डर मध्ये पो.ह. रावराणे यांनी ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि. सुर्यवंशी, एसीपी सोनवणे साहेब, दोन सरकारी पंच तसेच सापळा कारवाईत सहभाग घेणारे पोलीस अंमलदार रावराणे असे पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाचे बाहेरील रस्त्यावर माझे खाजगी कार क्र एमएच–०१–सीटी– ३०५६ मध्ये बसुन भायखळा अग्निशामक दलाचे कार्यालयाचे जवळ आलो तेथे कार थांबविली. त्यानंतर सहा. अभियंता, रंजन बागवे साहेब यांचे कार्यालयात जाताना मला व पंच श्री. सुरवाडे यांना सुचना दिल्या व त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतील बाजूस बनीयनला सेप्टी पिनच्या सहाय्याने पो.ह. रावराने यांनी लावला. त्यानंतर एसीपी सोनवणे साहेब यांचे सुचनेप्रमाणे मी व पंच सुरवाडे असे पायी चालत श्री. बागवे यांच्या कार्यालयाकडे रवाना झालो. 'मी व पंच सुरवाडे यांनी ई वार्डमध्ये प्रवेश केला व वार्डचे पहिल्या मजल्यावर असलेले लोकसेवक श्री. बागवे यांचे दालन मध्ये गेलो. सदरवेळी लोकसेवक बागवे साहेब हे त्यांचे केबीनमध्ये उपस्थित होते. मी लोकसेवक बागवे यांचे केबीनमध्ये गेलो त्यावेळी पंच श्री सुरवाडे हे माझ्या सोबत होते. मी त्यांची ओळख माझे नातेवाईक असल्याची करून दिली. पंच सुरवाडे माझ्या सोबत असल्याने श्री. बागवे यांनी माझे बरोबर पैश्यांची डीलबाबत चर्चा केली नाही. परंतु मला येत्या बुधवारी भेटण्यास बोलावले. म्हणुन मी पंचासह पडताळणी पथकाकडे निघुन आलो. तेथे पो.ह. रावराणे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे जवळ घेतला.

बुधवार दि. ०४/१२/२०२४ रोजी मी बागवे साहेबांना भेटण्याबाबत फोन केला. परंतु त्यांनी माझा फोन उचलला नाही म्हणुन मी त्यांना '' आज आपने बोला था आने को कितना बजे आनेका है आप फोन भी नही पिक अप् करते हो '' असा टेक्स मेसेज केला त्यावर बागवे साहेबांनी इंग्रजी मध्ये '' I Will call you back'' असे टेक्स मेसेजने उत्तर दिले त्यावर मी '' ओके'' म्हटले व इंग्रजीमध्ये '' But Sir i am

समक्ष,

( प्रकाश सोनवणे ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( धिरज शामजी गोहील )

Waiting for your office plz answer yes or no '' असा टेक्स मेसज पाठविला त्यावर त्यांनी '' Your work is done come tomorrow 12 noon'' असा रिप्लाय दिला.

त्याप्रमाणे दि.०५/१२/२०२४ रोजी मी, माझा स्वत:च्या मालकीचा सोनी कंपनीचा व्हाईस रेकॉर्डर घेवुन दुपारी ०१:०० वाजताच्या सुमारास लोकसेवक बागवे यांच्या दालनात गेलो. तेथे मला बागवे साहेब भेटले त्यांना मी विचारले साहेब २९ नोंव्हेबरला तुम्ही टेंशन मध्ये होते का? माझे कामाबद्दल लक्ष दिले नाही. तेव्हा त्यांनी सांगितले की, त्यावेळी माझी जेवणाची वेळ होती व घरचे पण टेंशन होते. आता मी फ्रि आहे, तुमचे काम करतो. तेव्हा त्यानी मला सांगितले की, १० लाख द्यावे लागतील, त्यावर मी त्यांना जास्त होतील असे सांगितले असता, आमच्यात तडजोड होवुन दोन फाईलचे सहा लाख रुपयामध्ये डील फायनल झाली. हे सर्व संभाषण मी माझे खाजगी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्डींग केले. सदरची रेकॉर्डींग घेवुन मी लाप्रविच्या कार्यालयात आलो तेथे सोनवणे साहेब व पोनि सुर्यवंशी यांना भेटलो. त्यांनी रेकॉर्डिंग ऐकले. त्यानंतर तात्काळ पंच सुरवाडे व पंच गव्हाणे यांना बोलावून त्यांच्या समक्ष माझे व लोकसेवक बागवे यांचे सोबत रेकॉर्डींग झालेले संभाषण परत एकदा ऐकले. सदरची रेकॉर्डींग ऐकुन एसीपी सोनवणे साहेब व पंच यांची लोकसेवक बागवे साहेब यांनी सहा लाख रूपयांची लाच मागितल्याची खात्री झाली. त्यानंतर माझा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पुढील कार्यवाहीकरीता एसीपी सोनवणे साहेबयांनी पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेतला आहे.

त्यानंतर एसीपी सोनवणे साहेब व पोनि सुर्यवंशी व पंच माझेसह गोपनिय कक्षामध्ये गेलो तेथे रावराणे यांनी वक्तव्य घेतले. एसीपी सोनवणे यांनी मला, पोलीस पथक व दोन पंचाना सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर मी माझ्या बचतीतून आणलेली लाचेची रक्कम रु.२०,०००/—(भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या एकुण ४० नोटा) पो.नि.सुर्यवंशी यांचेकडे सुपुर्द केल्या. पोनि सुर्यवंशी यांनी नोटांच्या क्रमांकाचे झेराक्स काढून घेतले. व उर्वरीत रक्कम म्हणुन २,८०,०००/— ही खेळण्यातील डमी नोटा वापरण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

त्यानंतर पो.नि. सुर्यवंशी यांनी मला व दोन पंचांना ॲन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म सागितले व त्यांचे सुचनेनुसार पथकातील वाहन चालक श्री. चिंचोलकर यांनी नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावली. व ती रक्कम एका खाकी रंगाच्या पाकीटामध्ये टाकुन श्री चिंचोलकर यांनी अलगद माझे हातात असलेल्या लाल रंगाच्या कापडी पिशवीमध्ये ठेवली. तसेच श्री चिंचोलकर हे सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यांनतर आम्ही दोन शासकिय वाहनाने वरळी नाका— सातरस्ता— फायर ब्रिगेड भायखळा कार्यालय येथे कुणाला संशय येणार नाही अश्या रितीने आमचे वाहन थांबविले. सदर ठिकाणी माझा मित्र श्री. मुकेश कटारिया हा भेटला.

त्यांनतर पो.नि. सुर्यवंशी यांनी पो.ह रावराणे यांच्या मदतीने डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टाचे आतील बाजुस बनीयनला सेप्टी पिनच्या सहाय्याने अडकविला. त्यानंतर सोनवणे साहेब यांचे सुचनेनुसार मी माझा मित्र श्री. मुकेश व पंच गव्हाणे असे पायी चालत श्री बागवे यांच्या कार्यालयाकडे निघालो. आमच्या पाठोपाठ

समक्ष,

( प्रकाश सोनवणे ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( धिरज शामजी गोहील )

पथकातील अधिकारी व अंमलदार कोणासही संशय येणार नाही, अशा पध्दतीने आमचे पासुन काही अंतर ठेवुन 'ई' वार्ड पहिल्या मजल्यावर आजुबाजुला येवून थांबले.

त्यावेळी मी पहिल्या मजल्यावरील श्री बागवे यांचे केबीनमध्ये जाते वेळी माझे सोबत असणारे पंच श्री गव्हाणे यांचे बाबत श्री बागवे यांना संशय येवु नये म्हणुन पंच श्री गव्हाणे यांना श्री बागवे यांच्या कक्षाच्या समोर मी व बागवे साहेब दिसेल अशा स्थितीत थांबण्यास सांगितले. त्यांचे सोबत माझा मित्र मुकेश हा देखील थांबला. त्यांनतर मी श्री.बागवे यांचे कॅबिनमध्ये जावुन समोर बसलो. तेव्हा श्री.बागवे मला बोलले की, '' **आप लाये हो... हं... इसमे रखो बॉक्स मे... पॅकेट मे है ना... पॅकेट मे... अलग अलग है... यहा पे दिखाव... बॉक्स मे रख... हा... अंदर अंदर रख... बॉक्स मे मै ये साईन लेकर आता हु... ठिक है... और मिलोगे कब मुझे... कल मिलोगे... वो ॲग्रीमेंट के मै आपके पास दे दुंगा... ठिक है... तो आप साईन लेके उसमे वापस..**'' मी त्यांना म्हणालो, '' **अपना कितना बात हुआ था कल सर... कितना बात हुआ था अपना त्यावर ते ''छे का..'' छे का... उसमे से मै फिफ्टी परसेंट दिया हा... और मंडे को बाकी सब लेके आना... हा फिर मंडे को... . फिर कल मिलना एक बार...** असे बोलून लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करून सदर रक्कम मला त्यांचे टेबरावरील एका खाकी रंगाच्या खोक्यामध्ये ठेवण्यास सांगितले. त्यानंतर मी माझे सोबत आणलेली लाचेची रक्कम रु.३,००,०००/— ( भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या एकुण ४० नोटा व उर्वरीत ५६० खेळण्यातील नोटा ) केशरी रंगाचे लिफाफ्यासह बागवे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे टेबलवरील बॉक्समध्ये ठेवले. त्यांनंतर मी ई विभागातील घनकचरा व्यवस्थापन कक्षाच्या बाहेर येवुन बाहेर येवून ठरल्याप्रमाणे उजवा हात डोक्यावरुन फिरवुन नियोजीत इशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी, अंमलदार व पंच श्री बागवे यांच्या दालनात आले व त्यांनी पंचासमक्ष श्री बागवे यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले.

तरी, दि. ५/१२/२०२४ रोजी सायंकाळी १८:०५ वाजण्याचे सुमारास लोकसेवक रंजन चंद्राकात बागवे, सहाय्यक अभियंता, यांनी माझे ''पैसे द्या आणि वापरा'' तत्वावरील शौचालयाचे बांधकामाचे दोन ॲग्रीमेंटचे रु.१०,००,०००/— (अक्षरी रूपये दहा लाख) ची मागणी केली. त्यानंतर तडजोडीअंती रु.६,००,०००/— (अक्षरी रूपये सहा लाख)ची मागणी करून पाहिला हफ्ता रू ३,००,०००/—(अक्षरी रूपये तीन लाख) लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारून गैरफायदा मिळण्याकरीता कायदेशीर परीश्रमाखेरीज स्वत:साठी लाचेची मागणी करून ती स्वीकारली म्हणून माझी लोकसेवक रंजन चंद्रकात बागवे, सहाय्यक अभियंता, मुंबई महानगरपालिका 'ई' वार्ड, मुंबई यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझे लोकसेवक श्री. रंजन चंद्राकात बागवे, सहाय्यक अभियंता, कचरा व घनव्यवस्थापन 'ई' वार्ड, मुंबई यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचुन पाहिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( प्रकाश सोनवणे ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( धिरज शामजी गोहील )

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य ........ —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........ —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.
यातील फिर्यादी हे मनपा विभागामध्ये पे ॲन्ड युज येथे कॉन्ट्रक्टर म्हणुन काम करतात. मनपा आयुक्त यांचे मार्फत सर्व कॉन्ट्रक्टर यांना अग्रीमेंट बनवून घेण्याबाबत नोटीस पाठविण्यात आली होती. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी दोन वर्षापुर्वी अर्ज दिला होता. परंतु मनपा अधिकारी यांचेकडुन टाळाटाळ केली जात होती. दोन महिन्यापुर्वी यातील आरोपीशी मिटींग झाली. व फिर्यादीकडे दहा लाख रुपये मागणी करण्यात आली. आलोसे यांनी भेटण्यास बोलाविले फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि. 29/11/24 रोजी लाप्रवि येथे येवुन समक्ष अर्ज दिला. दि. 05/12/24 रोजी पडताळणी केली असता आरोपी तडजोडअंती सहा लाखची मागणी करुन पहिला हप्ता तीन लाख रु स्विकारले म्हणुन भ्र.प्र.का. 1988 चे कलम 7 अन्वये गुन्हा दाखल

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
प्रकाश सोनवणे. स.पो.आ
2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नांव, Name प्रकाश सोनवणे
हुद्दा, Rank स.पो.आ.
नेमणूक व क्र. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 06/12/2024
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

ASSTT. COMMISSIONER OF POLICE, ANTI-CORRUPTION BUREAU, सत्यमेव जयते MUMBAI